लोकमत

# विद्यार्थ्यांच्या पोवाड्याने रंगला मराठी भाषा दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मालाड येथील चिल्ड्रन वेल्फेअर सेंटर विधी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाड्याने सभागृह भारावून गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत कलसे यांनी मराठी भाषेच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक योगदानावर प्रेरणादायी भाषण दिले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून, ती आपल्या अस्मितेचे प्रतीक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. चिल्ड्रन वेल्फेअर सेंटर ट्रस्टचे सचिव अजय कौल यांनी मराठी संस्कृती आणि भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महाविद्यालय कायम पुढाकार घेईल, असे सांगितले.

## सुमधुर गायनाने वाढवली कार्यक्रमाची रंगत

कार्यक्रमात पसायदान, भजन याबरोबरच मराठी गाण्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी महाविद्यालयाचे विश्वस्त विष्णू दांडेकर यांनी सुमधुर गायनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. प्राध्यापकांनी स्त्रीशक्तीवरील गौरवपर कविताही सादर केली.

**यावेळी स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे माजी समन्वयक सुभाष दळवी, व्यवस्थापन प्रतिनिधी सूरज वाधवा आदींसह प्राध्यापक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.**

कार्यक्रमाच्या सूत्रसंचलनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या समारोपाला महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले.